# लिलावाच्या अटी व शर्ती

१. लिलावात निघालेले भंगार निरूपयोगी जड वस्तु साहित्य (लोखंडी, लाकडी, प्लास्टीक) यांचा लिलाव जसे आहे तिथे आहे. या तत्वावर होईल.

२. जुन्या भंगार साहित्याचा लिलावात समावेश असून त्याचा लिलाव करण्यात येईल.

३. ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी दि. २३/०५/२०२५ शुक्रवार रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत रोखीने रक्कम १०,०००/– (अक्षरी– दहा हजार रूपये फक्त) भरणा करावे. तसेच दुपारी १२.०० वाजता नतंर कुठलीही अनामत रक्कम स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४. ज्यांनी अनामत रक्कम दि. २३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता च्या आत भरली असेल त्यांनाच बीडर नबंर देण्यात येईल व त्यानांच लिलावाच्या ठिकाणी आधार कार्डच्या झेरॉक्ससह हजर राहता येईल व लिलावात भाग घेता येईल इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावात भाग घेता येणार नाही.

५. लिलाव समितीचे सदस्य व संबधीत कार्यालयीन कर्मचारी लिलावाचे ठिकाणी उपस्थीत राहू शकतील व निरीक्षण करतील.

६. लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्यां व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल त्यांना लिलावाची बोली पाहून मान्यता देण्यात येईल व त्याबाबतचा अंतिम निर्णय गठीत समिती घेईल.

७. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावार अवलबून राहिल.

८. साहित्य बोली झाल्यास व सदर वस्तूंच्या किमती कायम झाल्यास किमतीच्या किमतीच्या ५०% (पन्नास टक्के) रक्कम त्याच दिवशी व उर्वरीत ५०% (पन्नास टक्के) रक्कम लिलाव अंतिम झाल्यापासुन तिन दिवसात भरावी लागेल. रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.

९. बोली कायम झाल्यास संबंधीत व्यक्तीनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहून नेण्याची त्यांनतर सर्व खर्चाची व जोखमेची जवाबदारी त्यांची स्वता:ची असेल.

१०. लिलाव झालेल्या साहीत्याची पूर्ण किमंत भरल्यानंतर सदर वस्तू खरीददाराणे ३ दिवासाच्या आत विद्यापीठ परीसरातून स्वत:च्या ताब्यात घ्यावी अन्यथा सदर साहित्याची देखभालीची व गहाळ झाल्यास विद्यापीठाची जवाबदारी राहणार नाही. यांची नोंद घ्यावी.

११. ज्यांची बोली अमान्य ठरली असेल त्यांना अनामत रक्कम परत करण्यात येईल.

१२. साहित्याची वाहतूक करतांना विद्यापीठातील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही यांची जबाबदारी खरीदीदारांची असेल.

१३.लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरूपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव सपेंपर्यंत दयावी. अन्यथा तक्रारीच्या विचार करण्यात येणार नाही. लिलावात सहभागी नसलेल्या व्यक्तीची तक्रार स्विकृत करण्यात येणार नाही.

१४.लिलावात काही अडचण अथवा वाद विवाद उत्पन्न झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतिम आणि सर्वानांच बंधनकारक राहील.

१५.लिलाव कोणत्याही कारणास्तव ददद करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.

१६.लोखंडी साहित्याची विक्रीची बोली प्रति किलो दराप्रमाणे राहील. यामध्ये निरूपयोगी जड वस्तू प्लास्टिक, लोखंडी व लाकडी साहित्य इतर पातळ किंवा जाड लोखंडी साहित्याचा समावेश राहील, तसेच प्रत्यक्ष रक्कम अंतिम वजन परिमाणानुसार भरावी लागेल. सदर साहित्य उचल करणे हमाली व वाहतुकीची जबाबदारी घेणाऱ्यांची राहील तसेच वजन करण्याची व त्यासाठी खर्चाची जबाबदारी सुध्दा राहील.

प्राचार्य
कृ.त.वि., हिवरा